# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

**प्रथम खबर अहवाल**

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** धुळे **P.S.(ठाणे):** धुळे शहर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0079 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 10/03/2025 22:37

2.

| **S.No. (अ.क्र.)** | **Acts (अधिनियम)** | **Sections (कलम)** |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन **Date From (दिनांक पासून):** 07/03/2025

**Time Period (कालावधी):** **Date To ( दिनांक पर्यंत):** 10/03/2025

**Time From (वेळेपासून):** 15:44 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 16:59 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 10/03/2025 **Time (वेळ):** 22:15 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 032

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 10/03/2025 22:15 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

उत्तर, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** उपविभागीय अधिकारी कार्यालयात,धुळे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):** धुळे शहर

**District(State) (जिल्हा(राज्य)):** धुळे(महाराष्ट्र)

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** भुषण पितांबर घरटे
(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1999
(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**
**Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | कोकले, ता साक्री, ,कोकले, ता साक्री, जि धुळे,धुळे शहर,धुळे,महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | कोकले, ता साक्री, ,कोकले, ता साक्री, जि धुळे,धुळे शहर,धुळे,महाराष्ट्र, भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**
(j) **Phone number (फोन नं.):**
**Mobile (मोबाइल नं.):** 91-8767506180

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | दिनेश सुर्यभान वाघ | | वडील का नाम : सुर्यभान वाघ | 1. 19-अ,,नकाणेरोड, धुळे,बिजली नगर,धुळे,धुळे शहर,धुळे, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 13,000/रु लाच स्विकारली व | 13,000.00 |

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| | | | हस्तगत केलेली रक्कम | |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

13,000.00

**11. Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

धुळे शहर पोलीस स्टेशन, गु.र.नं.79/2025 भ्र.प्र.का. सन 1988 चे कलम 7 व 7-अ प्रमाणेमी भुषण पितांबर घरटे, वय 26 वर्ष, व्यवसाय शेती, रा. कोकले, ता. साक्री, जि. धुळे, मो. नं. 8767506180 समक्ष पोलीस स्टेशनला हजर राहुन फिर्याद देतो की, माझा चुलत भाऊ रोहित बळीराम घरटे याचा गौण खनिज वाहतुकीचा व्यवसाय असुन त्याचे वाळुचे ट्रॅक्टर क्र. एम.एच. 18 जे 8597 हे दि. 24.02.2025 रोजी मौजे कोकले, ता. साक्री शिवारात वाहतुक करतांना महसुल विभागाच्या भरारी पथकाने पकडले होते. सदर ट्रॅक्टरचा भरारी पथकातील श्री चेतन महाजन, तलाठी दातर्ती यांनी दि.25.02.2025 रोजी पंचनामा करुन सदर पंचनाम्यात ट्रॅक्टरचा वाहन क्र. एम.एच. 18 एन 8797 असा टाकलेला आहे. सदरचे ट्रॅक्टर साक्री तहसिल कार्यालयाचे आवारात जमा करुन तहसिलदार साक्री यांनी सदर ट्रॅक्टरवर नियमानुसार दंडात्मक कारवाई करणेकरीता दि.27.02.2025 रोजी उप विभागीय अधिकारी, धुळे यांच्याकडे अहवाल पाठविला होता. त्यानंतर मी माझ्या चुलत भावाच्या सांगण्यावरुन दि. 05.03.2025 रोजी उप विभागीय अधिकारी कार्यालय, धुळे येथे जावुन महसुल सहायक दिनेश वाघ यांची भेट घेतली असता त्यांनी माझ्याकडे भावाच्या नावे ट्रॅक्टरवर दंड आकारण्याची नोटीस देवुन उप विभागीय अधिकारी यांचेकडुन आकारणी केलेल्या दंडाची रक्कम कमी करुन देण्याकरीता 15,000/- रुपये लागतील अशी लाचेची मागणी केल्याची मी दि. 07.03.2025 रोजी ला.प्र.वि. धुळे कार्यालयात तक्रार दिली होती.

तेव्हा मी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दि. 07.03.2025 रोजी माझेकडेस व्हाईस रेकॉर्डर चालु करून देवुन मला महसुल सहायक दिनेश वाघ यांची भेट घेण्यासाठी उप विभागीय अधिकारी कार्यालय, धुळे येथे पंच नं. 01 मयुर सोनवणे यांचेसह माझी कार क्र. एम.एच. 04 ईजे 5151 ने ला.प्र.वि. धुळे कार्यालयातुन रवाना केले. त्याप्रमाणे मी व पंच सोनवणे अशांनी तेथे जावुन दिनेश वाघ यांची भेट घेतली तेव्हा मी माझा भाऊ रोहित घरटे याने माझ्याकडे दिलेला खुलासा कार्यालयातील टपालामध्ये जमा केला. तेव्हा दिनेश वाघ यांनी माझ्याकडे "तुझ्या इच्छे प्रमाणे दे" अशी लाचेची मागणी करुन मला दि. 10.03.2025 रोजी बोलविले होते.

त्यानंतर आज दि. 10.03.2025 रोजी माझेकडेस व्हाईस रेकॉर्डर चालु करून देवुन मला महसुल सहायक दिनेश वाघ यांची भेट घेण्यासाठी उप विभागीय अधिकारी कार्यालय, धुळे येथे पंच नं. 01 मयुर सोनवणे यांचेसह माझ्या कारने ला.प्र.वि. धुळे कार्यालयातुन रवाना केले. त्याप्रमाणे मी व पंच सोनवणे अशांनी तेथे जावुन दिनेश वाघ यांची भेट घेतली. तेव्हा दिनेश वाघ यांनी माझ्याकडे तडजोडीअंती 13,000/- रुपये लाचेची मागणी केली आहे. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री साळुंखे यांनी सापळा आयोजित करुन माझ्याकडुन 500/- रुपये दराच्या 26 नोटा असे एकुण 13,000/- रुपये सापळाकामी घेवुन सदर नोटांना पावडर लावुन सदरची रक्कम माझ्या पॅन्टच्या उजव्या खिशात ठेवली. त्यानंतर मला व्हाॅईस रेकॉर्डर दिल्यावर मी व पंच सोनवणे असे धुळे उप विभागीय अधिकारी कार्यालयात दिनेश वाघ यांना लाचेची रक्कम देण्यासाठी रवाना झालो. तेथे गेल्यावर दिनेश वाघ यांनी माझ्याकडे तहसिलदार, साक्री यांच्या नांवे अहवाल सादर करण्याबाबतचे पत्र देवुन पैशांची मागणी केली. तेव्हा मी माझ्या पॅन्टच्या खिशातुन लाचेची रक्कम काढुन त्यांच्या समोर धरली असता त्यांनी सदर लाचेची रक्कम त्यांच्या उजव्या हाताने स्विकारुन त्यांच्या दोन्ही हाताने मोजुन त्यांच्या पॅन्टच्या उजव्या खिशात ठेवुन घेतली तेव्हा पोलीस उप अधीक्षक साळुंखे व सापळा पथकाने त्यांना ताब्यात घेतले. तरी माझा चुलत भाऊ रोहित बळीराम घरटे याचे ट्रॅक्टरवर आकारणी केलेल्या दंडाची रक्कम धुळे उप विभागीय अधिकारी यांचेकडुन कमी करुन देण्यासाठी माझे कडुन दि.07.03.2025 व दि.10.03.2025 रोजी तडजोडीअंती 13,000/- रुपये लाचेची मागणी करुन सदर

लाचेची रक्कम दि.10.03.2025 रोजी धुळे उप विभागीय अधिकारी कार्यालयात पंचासमक्ष स्वतः स्विकारली आहे. म्हणुन त्यांचेवर कायदेशीर कारवाई होणेसाठी माझी फिर्याद आहे.
माझी वरील फिर्याद मी वाचुन पाहिली असुन ती माझे सांगणेप्रमाणे बरोबर टंकलिखीत केलेली असल्याने त्यावर मी माझी सही करीत आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**
dipak dagadu patil(I (Inspector)) / **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S.**
**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

पोलीस ठाणे अंमलदार
धुळे शहर पोलीस स्टेशन

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** dipak dagadu patil
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):**